# सामाजिक जाणिवेतून अर्थकारण हवे

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी : ऑटोव्हॉल्टमुळे ग्राहकांना ऐवज सुरक्षितपणे उपलब्ध होणार

वार्ताहर

वडाळा

सामाजिक जाणिवेतून अर्थकारण करण्याची खरी गरज आहे. या जाणिवेतूनच समाजातील विविध घटकात सुधारणा करणे शक्य होईल, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. सोमवारी दादर शिवाजी पार्क येथे 'गोदरेज सिक्युरिटी सोल्युशन्स'ने बँकिंग सुरक्षिततेला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत 'ऑटोव्हॉल्ट' या स्वयंचलित सेफ डिपॉझिट लॉकरचा सुविधा उपलब्ध केली आहे. याचा शुभारंभ बुलडाणा नागरी सहकारी क्रेडिट



सोसायटी लि. च्या दादर येथील शाखेच्या उद्घाटन सोहळ्यात करण्यात आला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गडकरी उपस्थित होते. कर्ज थकविणाऱ्या प्रत्येक उद्योगपतींच्याविरोधात कारवाई केल्यास अर्थव्यवस्था मंदावेल. त्यामुळे व्यवसाय करण्यासाठी कोणताही धोका पत्करायला तयार होणार नाही. उद्योजक घेतलेले कर्ज फेडू शकला नाही, त्याचे कारण समजून घेतले पाहिजे. व्यवसाय चालवताना अनेक अडचणी आणि जागतिक परिस्थितीकडे पाहणे गरजेचे असते. त्यामुळे प्रत्येक कर्ज थकवणाऱ्यांविरोधात कारवाई करू नये, असा सल्ला गडकरी यांनी उपस्थितांना दिला. यावेळी विधान परिषदेचे सभापती रामराजे नाईक-निंबाळकर, राज्याचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री गिरीश बापट पतसंस्थेचे संचालक मंडळ उपस्थित होते.

बहुस्तरीय सुरक्षा प्रणालीने सज्ज असलेल्या ऑटोव्हॉल्टमुळे ग्राहकांना कोणत्याही त्रासाविना तसेच कर्मचाऱ्यांच्या हस्तक्षेपाविना आपला मौल्यवान ऐवज कोणत्याही वेळी उपलब्ध होऊ शकेल. याशिवाय, या उपाययोजनेमुळे ग्राहकाला रुममध्ये पूर्णपणे गोपनीयता राखली जाईल. आपले स्मार्ट, ॲक्सेस कार्ड स्वाईप केल्यावर ग्राहकाला लॉकर रुमपर्यंत पोहोचता येईल.